महावितरणच्या वीज थकबाकी 'अभय' योजनेला कोल्हापूरकरांचा उत्तम प्रतिसाद

▌१३,६३२ वीज ग्राहकांनी भरली १० कोटी ५५ लाखांची थकबाकी

▌कोल्हापूर/सांगली : विजेच्या बिलाचा वेळीच भरणा न केल्याने कोल्हापूर परिमंडल कार्यालयांतर्गत ९७,३८६ ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केला होता. या ग्राहकांना थकबाकीतून मुक्त होऊन पुन्हा वीज जोडणी घेण्याची संधी अभय योजनेच्या माध्यमातून महावितरणने उपलब्ध करून दिली आहे. या संधीचा लाभ घेत कोल्हापूर परिमंडल कार्यालयातील १३,६३२ लघुदाब व उच्चदाब वीज ग्राहकांनी १० कोटी ५५ लाखांचा भरणा करीत आपला सहभाग नोंदवला आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ८,५५७ ग्राहकांनी ७ कोटी ११ लाख, तर सांगली जिल्ह्यातील ५,०७५ ग्राहकांनी ३ कोटी ४४ लाख रुपयांचा भरणा केला आहे.

जनमित्रांची महत्त्वाची भूमिका

या योजनेच्या जनजागृतीत जनमित्र अर्थातच वायरमन यांचे महत्त्वाचे योगदान आहे. ग्राहकांच्या शंकेचे निरसन केल्याने ते थकीत वीज बिल भरत आहेत. जनमित्र गावागावांत प्रत्यक्ष जाऊन ग्राहकांना या योजनेची माहिती व महत्त्व पटवून देत आहेत. जनमित्रांकडून जनजागृती अभियान सकारात्मकदृष्टीने राबविल्याने अभय योजनेस कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांत चांगला प्रतिसाद मिळत आहे.

योजनेचे शेवटचे फक्त १३ दिवस शिल्लक

वीज बिलांच्या थकबाकीमुळे ३१ मार्च २०२४ पर्यंत कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या तसेच कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित सर्व अकृषक वीज ग्राहकांसाठी महावितरण अभय योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना या योजनेत सहभाग नोंदवण्याकरिता बुधवारपासून (१९ मार्च) फक्त १३ दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अद्याप ८३,७५४ ग्राहकांना योजनेत सहभाग नोंदवण्याची संधी

महावितरणने कायमस्वरूप वीजपुरवठा खंडित केलेल्या ८३,७५४ ग्राहकांना या योजनेत सहभाग नोंदवण्याची संधी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ३२,२४५ वीज ग्राहक, तर सांगली जिल्ह्यातील ५१,५०९ ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.

न्यायालयाच्या निकालानुसार, वीज बिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलल्यानंतरदेखील नवीन जागामालक किंवा ताबेदारांना थकबाकीची रक्कम भरावी लागेल, मात्र वीज बिलांच्या थकबाकीतून मुक्त होण्याची संधी ग्राहकांना उपलब्ध आहे. अभय योजनेनुसार, थकबाकीदारांनी केवळ मूळ थकबाकीचा भरणा केल्यास संपूर्ण १०० टक्के व्याज व विलंब आकाराची (दंड) रक्कम माफ होत आहे.

मुंबईत राज्य सांस्कृतिक केंद्र व राज्य वस्तुसंग्रहालय उभारणार

▌सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची विधानसभेत घोषणा

▌मुंबई : राज्याचे राज्य सांस्कृतिक केंद्र व वस्तुसंग्रहालय मुंबईत उभारण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत मंगळवारी निवेदनाद्वारे केली. वांद्रे-कुर्ला संकुलात साडेतीन एकराहून अधिक जागेवर ही वास्तू बांधली जाणार आहे.

शेलार यांनी निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राला वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या वारशाचे जतन व संवर्धन करणे हे राज्यशासनाचे आद्य कर्तव्य आहे. या अनुषंगाने राज्यस्तरीय एक भव्य 'राज्य सांस्कृतिक केंद्र' व 'राज्य वस्तुसंग्रहालय' राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी असणे अभिप्रेत आहे. राज्य सांस्कृतिक केंद्रामध्ये भव्य ऑडिटोरियम, कलादालने व रिसर्च सेंटर इत्यादी बाबी नियोजित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी राज्य सांस्कृतिक केंद्र हा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रदर्शन देशी-विदेशी पर्यटकांसाठी आकर्षण असेल. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कलाकारांसाठी एक व्यासपीठ म्हणून हे केंद्र कार्यरत असणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विविधतेची मांडणी एकाच छताखाली आणण्यासाठी राज्यस्तरीय सांस्कृतिक भवनाची आणि राज्य वस्तुसंग्रहालयाची राज्याच्या राजधानीत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलात अधिसूचित क्षेत्रातील सर्व्हे नंबर ३८१ न.भु.क्र., ६२९ (पै) येथील १४ हजार ४१८ चौरस मीटर हा भूखंड महसूल विभागाकडून सांस्कृतिक कार्य विभागास विनामूल्य हस्तांतरित करण्यात येईल व त्या ठिकाणी भव्य राज्य सांस्कृतिक केंद्र व राज्य वस्तुसंग्रहालय उभारण्यात येईल.

राज्य वस्तुसंग्रहालयामार्फत प्राचीन भारतीय वारशाचे जतन करून पुढील पिढ्यांना ते दाखवण्याचे काम, विविध उत्खनने आणि शोध कार्यक्रमांतून उजेडात आलेल्या कलाकृती, महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तू, शस्त्रे आणि विणकाम, कपडे आणि पोशाख, शिल्पे आणि कलावस्तू कलाकृती, शिलालेख, ताम्रपट, प्राचीन-मध्ययुगीन रचनात्मक अवशेष आणि थोर कलाकारांच्या दुर्मीळ चित्रकृती जतन करणे साध्य होईल, असेही शेलार यांनी सांगितले.

...म्हणून औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा - लोंढे

▌मुंबई : सरकारचे अपयश झाकण्यासाठी आणि जनतेच्या मूळ मुद्द्यांपासून लक्ष विचलित करण्यासाठी देशात जाणीवपूर्वक औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा पुढे केला जात असल्याचा आरोप प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी बुधवारी केला. धार्मिक मुद्द्यांवर ज्या देशात वाद निर्माण केले जातात, त्या देशात परकीय गुंतवणूक येत नाही; तीच भारताची आज परिस्थिती झाल्याचे लोंढे म्हणाले.

माध्यमांसमोर बोलताना ते म्हणाले, देशातील शेतकऱ्यांवर ११ लाख कोटी रुपयांचे कर्ज असल्याचे सांगितले जाते. पण, ते माफ करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, गेल्या १० वर्षांत उद्योगपती मित्रांचे १६.३५ लाख कोटी रुपयांचे कर्ज याच केंद्र सरकारने माफ केले आहे. म्हणजे, शेतकऱ्यांच्या कर्जापेक्षा तब्बल ५.३५ लाख कोटी जास्तीचे कर्ज माफ करण्यात आले. मग शेतकरी, बेरोजगारांनीच या सरकारचे काय बिघडवले आहे? अशी टीकाही त्यांनी केली.

शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात सर्व सोयीसुविधा

▌मुंबई : शिवडी येथील क्षयरोग रुग्णालय हे राज्यातील सर्वात मोठे क्षयरोग रुग्णालय असल्याने या रुग्णालयास आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा पुरवण्यात येतील, असा विश्वास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी बुधवारी विधान परिषदेत दिला. भाजपचे सदस्य श्रीकांत भारतीय यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मिसाळ यांनी हा विश्वास दिला. क्षयरोग रुग्णालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे तसेच रक्षकांची नेमणूक करण्यात आली. रुग्णसेवेसाठी विशेषज्ञ, वैद्यकीय सल्लागार, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व शल्यचिकित्सक या संवर्गातील २० पदे कार्यरत आहेत, असे मिसाळ म्हणाल्या.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

ई-निविदा आमंत्रण सूचना

प्रधान मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे सिंगल बिड सिस्टीममध्ये खुल्या निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव: कोंकण रेल्वे विहार, सीवूड्स (पश्चिम), नेरुळ, नवी मुंबई येथे वशिष्ठी भवन आणि मधुबन समोरील लॉनची देखभाल. निविदा सूचना क्रमांक: केआर-डब्ल्यू-09-2024-17, दिनांक: 19.03.2025. अंदाजे खर्च**: जीएसटी वगळून रु. 4,78,593/-. **ऑनलाइन ऑफर/बिड सबमिट करण्याची शेवटची तारीख/वेळ**: 10.04.2025 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण कालावधी:** पावसाळ्यासह दोन महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया **https://ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्या. शुद्धीपत्र/परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर होस्ट केले जाईल.

औसा नगरपरिषद कार्यालय, औसा, जि. लातूर

जा.क्र. 2025/नपऔ/बांधकाम व पा. पु. व स्व./कावि-511 दिनांक : 19/03/2025

जाहीर ई-निविदा सूचना शुद्धीपत्रक

सा. बां. वि. ई-निविदा सूचना क्र. 15, 16, 17 व 18 साल-सन 2024-25
पा. पु. व स्व. वि. ई-निविदा सूचना क्र. 04 साल-सन 2024-25

मुख्याधिकारी, नगरपरिषद, औसा यांच्या वतीने जा. क्र. 2025/नपऔ / बांधकाम व पा. पु. व स्व/कावि - 500 दिनांक 17/03/2025 अन्वये ई- निविदा सूचना करण्यात येऊन दिनांक 18/03/2024 पासून उपलब्ध करुन देण्यात येईल असे नमूद झाले होते. यात दुरुस्ती करुन व काही तांत्रिक अडचणीमुळे दिनांक 20/03/2025 पासून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा व वेळ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

स्वाक्षरित/-
(मंगेश शिंदे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, औसा, जि. लातूर

बृहन्मुंबई महानगरपालिका

प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांचे कार्यालय
पहिला मजला, वरळी अभियांत्रिकी संकुल, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी नाका, वरळी, मुंबई-४०० ०१८

क्र. प्र. अभि./यां. व वि./७६७९, दि. १९.०३.२०२५

ई-निविदा नोटीस

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून खालील नमूद कामांसाठी पात्र बोलीदारांकडून 'आयटम रेट बेसीस'वर ई-निविदा मागविण्यात येत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'निविदा' विभागांतर्गत तपशीलवार निविदा सूचनेमध्ये बोली सुरू करण्याची तारीख, वेळ आणि बोली समाप्तीची तारीख आणि वेळ नमूद केली आहे.

खाते	प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)
उपविभाग	कार्यकारी अभियंता, यां. (वि. प्र.) बांधकामे
विषय	१. एमएलटी हॉलमधील हेरिटेज प्रकारच्या आसन व्यवस्थेची दुरुस्ती आणि नूतनीकरणाचे काम (भाग-बी) 2025_MCGM_1162670_1 २. एमएलटी हॉलमधील हेरिटेज प्रकारच्या आसन व्यवस्थेची दुरुस्ती आणि नूतनीकरणाचे काम (भाग-सी) 2025_MCGM_1158980_1
निविदा विक्री	दि. २०.०३.२०२५ वेळ सकाळी ११.०० ते दि. २६.०३.२०२५ वेळ सायं. ०४.०० पर्यंत
वेबसाइट	http://portal.mcgm.gov.in
लिगल/ट्रेड नाव : जीएसटीआयएन क्र.	बृहन्मुंबई महानगरपालिका 27AAALM0042L3Z4
संपर्क : अ) नाव ब) दूरध्वनी क्र. क) भ्रमणध्वनी क्र. ड) ई-मेल	कार्यकारी अभियंता, यां. (वि.प्र.) बांधकामे श्री. मनोज ह. वानखेडे २४९५८१५३ ९६३७३४१००४ eemecheiconst.me@mcgm.gov.in

उपरोक्त नमूद निविदांच्या अधिक तपशिलासाठी इच्छुक निविदाकारांनी http://portal.mcgm.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

निविदासंदर्भातील कागदपत्रे पोस्टाने जारी किंवा प्राप्त होणार नाहीत.

सही/-
कार्य. अभियंता, यां. (वि.प्र.) बांधकामे

पीआरओ/२८६७/जाहि./२०२४-२५

स्वमर्जीने औषधोपचार करू नका

जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर
जाहीर ई - निविदा सूचना
बांधकाम विभाग

मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर दूरध्वनी क्रमांक 02322-225624 हे नगरपरिषद बांधकाम विभागाकडील विकास कामांसाठी तांत्रिक विभागाशी संलग्न नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरची ई - निविदा व सविस्तर माहिती तसेच ई - निविदेतील शुद्धीपत्रके, दुरुस्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक-२१/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दिनांक-२८/०३/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल व निविदा सादर करणेची अंतिम मुदत दिनांक - २८/०३/२०२५ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत असेल. सदर ई - निविदा उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करता येईल.

शिक्का
सही/- मुख्याधिकारी
जयसिंगपूर नगरपरिषद

मे. एस. बी. काळे कोर्ट, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वडगाव मावळ, पुणे.

स्पे. मु. क्र. १२८/२०२३
निशाणी क्र. १३९

जाहीर नोटीस

भारत दत्तात्रय शिंदे व इतर **-वादी**
विरुद्ध
२१ अ. ३. दिपा निलेश देशमाने,
२१अ. ४. रिंकी अरविंद शिंदे,
रा. सुखसागर सोसायटी, महात्मा गांधी रोड, ता. पनवेल, जि. रायगड
२१ क. अनिल हरिशचंद्र शिंदे,
रा. तळ्मजला दुर्वांकूर सीएचएस, राणीबाग, सक्सेस इंडस्ट्री, दादाजी कोंडदेवच्या विरुद्ध लेन, मुंबई ४०००२७. **-प्र. वादी**

ज्याअर्थी, अर्जदार यांनी तुमच्या विरुद्ध दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे दि. २१/०४/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होणेस पात्र ठरेल.

आज दिनांक १७/०३ /२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का
स्वाक्षरित
क. लिपीक
हुकूमान्वये
स्वाक्षरित/-
अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, वडगाव मावळ, पुणे

जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे याद्वारे ब प्रकारातील खालील नमूद सहकारी संस्थेची प्रारूप मतदार यादी हरकती व आक्षेप मागविण्यासाठी या कार्यालयात, संबंधित संस्थेत तसेच संबंधित पुणे शहरातील प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आलेली असून, संबंधित संस्थेच्या सभासदांनी खालील नमूद तारखानुसार प्रारूप मतदार यादीवर आक्षेप व हरकती लेखी स्वरुपात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे अथवा संबंधित पुणे शहरातील उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत दाखल करावयात.

अ.क्र.	संस्थेचे नाव
	उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर-२, टिळक रोड, क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला, शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२
१.	महाराष्ट्र बँक एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., ९३/२, बुधवार पेठ, बँक ऑफ महाराष्ट्र बिल्डींग, लक्ष्मी रोड, पुणे-४११ ००२.

वरील सर्व संस्थांसाठी :
१. मतदारांची प्रारूप यादी प्रसिद्धी दिनांक :- २०/०३/२०२५
२. प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना मागविणेची अंतिम दिनांक :- ०१/०४/२०२५

टीप :-
१. प्रारूप मतदार यादीवरील हरकती व आक्षेप घेणेच्या अंतिम दिनांकानंतर आलेल्या हरकती व आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ८ अन्वये प्रारूप मतदार यादीवरील हरकती व आक्षेपांचा निर्णय करून अंतिम मतदार यादी तयार करण्यात येईल.
३. अंतिम मतदार यादी संस्था कार्यालय, प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल.

ठिकाण : साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
दिनांक : २०/०३/२०२५.

स्वाक्षरित/-
(संजय राऊत)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी पुणे तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे.

श्रीकांत चेंबर्स प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.,

नोंदणी क्रमांक- एमयुएम/डब्ल्यूएम/जीएनएल/(ओ)/९३२६/२००५-२००६/सन २००५ दिनांक - २०/५/२००५
सीटीएस नं. ६६९, ७८३ (पार्ट), बोर्ला व्हीलेज, सायन-ट्रॉम्बे रोड, व्ही. एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई -४०० ०७१

मिळकतीच्या मानीव अभिहस्तांतरणासंबंधी जाहीर सुचना
(अर्ज क्रमांक २२/२०२५)

खालील मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत उपरोक्त संस्थेकडून या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी **दिनांक २७/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता** निश्चित केली आहे.

प्रतिवादी क्र.- १) श्रीकांत स्टुडिओज प्रा. लि., ५०२, सुप्रिम चेंबर्स, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३, **२) श्रीकांत चेंबर्स -२ प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि.**, सीटीएस नं. ६६९, ७८३ (पार्ट), बोर्ला व्हीलेज, सायन- ट्रॉम्बे रोड, व्ही. एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१ यांनी तसेच या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहुन सादर करावे. अन्यथा या प्रकरणी कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन :- श्रीकांत चेंबर्स प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लिमिटेड या संस्थेची इमारत व खालील तपशीलात नमूद केलेली जमीन मिळकत.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्लॉट नं.	सी.टी.एस. नं.	मागणी केलेले क्षेत्र
--	--	--	६६९, ७८३ (पार्ट) मौजे बोर्ला, ता.कुर्ला	२७२७.९२ चौ.मीटर + ४९३.४८ चौ. मीटर एकूण ३२२१.४० चौ. मीटर

जा.क्र./जिऊनि/मुंबई/नोटीस/६५०/सन २०२५
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२),
पूर्व उपनगरे, मुंबई
कार्यालय :- कक्ष क्र. २०१, कोकण भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४.
दिनांक :- १७/०३/२०२५
दूरध्वनी क्र. : ०२२-२७५७४९६५
ई-मेल : ddr2coopmumbai@gmail.com

शिक्का

सही/-
(नितीन दहिभाते)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२),
पूर्व उपनगरे, मुंबई करीता

बिलेश्वर टॉवर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक- बीओएम/डब्ल्युटी/एचएसजी/टीसी/८५०४/सन १९९७, दिनांक - १५/५/१९९७
पांच रस्ता, एम. जी. रोड आणि पी.के.रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई- ४०० ०८०

मिळकतीच्या मानीव अभिहस्तांतरणासंबंधी जाहीर सुचना
(अर्ज क्रमांक २३/२०२५)

खालील मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत उपरोक्त संस्थेकडून या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी **दिनांक - २७/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता** निश्चित केली आहे.

प्रतिवादी क्र.- १) मेसर्स बिलेश्वर बिल्डर, जिवराम भवन, तळमजला, आर. आर. टी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई- ८०, **२) रतनबाई लक्ष्मीदास राजगोर**, सीटीएस नं. ९७६, बिलेश्वर टॉवर, पांच रस्ता रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई- ८०, **३) श्री. लवाजी नरसाजी**, सीटीएस नं. ९७६, बिलेश्वर टॉवर, पांच रस्ता रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-८० यांनी तसेच या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहुन सादर करावे. अन्यथा या प्रकरणी कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन :- बिलेश्वर टॉवर को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेची इमारत व खालील तपशीलात नमूद केलेली जमीन मिळकत.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्लॉट नं.	सी.टी.एस. नं.	मागणी केलेले क्षेत्र
--	--	--	९७६, ९७६/१ ते ४२ मौजे मुलुंड, ता.कुर्ला	१४६७.६ चौ. मीटर

जा.क्र./जिऊनि/मुंबई/नोटीस/६५२/सन २०२५
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२),
पूर्व उपनगरे, मुंबई
कार्यालय :- कक्ष क्र. २०१, कोकण भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४.
दिनांक :- १७/०३/२०२५
दूरध्वनी क्र. : ०२२-२७५७४९६५
ई-मेल : ddr2coopmumbai@gmail.com

शिक्का

सही/-
(नितीन दहिभाते)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२),
पूर्व उपनगरे, मुंबई करीता

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी
(महाराष्ट्र शासनाची नोंदणी क्र. GBBSD ४८८/२०१९ खाली नोंदणीकृत स्वायत्त संस्था व भारत सरकार मार्फत दि. २५-१०-२०१९ अन्वये मान्यताप्राप्त)
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
६ वा मजला, पंचदीप भवन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३.
दूरध्वनी क्र. (०२२) २४९५५२९८, २४९५५३१६, २४९५०८६३, फॅक्स क्र. (०२२) २४९५०७९६
ई-मेल : ceo.mhesis@gmail.com

क्र. मुकाअ/मराकाविसो/का. क्र. ९/राज्य कामगार विमा सोसायटी, जाहिरात/६६८२/२०२५ दि. १९ मार्च २०२५

महा-राकावि सोसायटी अंतर्गत विमाधारकांना Secondary Medical Care पुरविण्यासाठी ESIC Referral Policy २०२३ नुसार राज्य सरकारी रुग्णालय/सार्वजनिक क्षेत्रातील रुग्णालये/खाजगी रूणालयांमार्फत अभिव्यक्ति स्वारस्य (EOI) व्यक्त करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.

राज्य कामगार विमा योजनेतील लाभार्थ्यांना ESIC Referral Policy २०२३ नुसार राज्य सरकारी रुग्णालय/सार्वजनिक क्षेत्रातील रुग्णालये/खाजगी रूणालयांमार्फत Secondary Medical Care Services पुरविण्याकरिता दि. २४.०२.२०२५ ते १७.०३.२०२५ रोजीपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर अर्ज करावयाची अंतिम तारीख दि. १७.०३.२०२५ पर्यंत होती. त्याअनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की, **सदर EoI/अर्ज मागविण्याच्या तारखेला दि. ३१.०३.२०२५ पर्यंत ह्या जाहिरातीद्वारे मुदतवाढ देण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.** त्यानुसार तपशीलवार माहिती https://tinyurl.com/2bf85vpz या link वर उपलब्ध आहे.

ज्या खाजगी रुग्णालयांनी सदर जाहिरातीमध्ये दि. १७.०३.२०२५ पर्यंत अर्ज केला आहे, अशा सर्व खाजगी रुग्णालयांनी, त्यांच्या रुग्णालयांचे इमारतीचे/ICU/OT/Ward/Casualty/Pathology/X-ray इत्यादींचे कलर फोटो दि. ३१.०३.२०२५ पर्यंत या कार्यालयात सादर करण्यात यावे, तसेच त्या सोबत कार्यरत सर्व डॉक्टरांचे Degree Certificate, Registration Certificate व Self Declaration (Format attached) सादर करण्यात यावेत. नव्याने अर्ज करणाऱ्या रुग्णालयांनी वरील नमूद सर्व बाबींसहित अर्ज करावेत.

सही/-
डॉ. शशी कोळनुरकर
संचालक (वैद्यकीय)
महा-राकावि सोसायटी, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/क्र.५/C-७२००

उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय
रुम नं.३०३, तिसरा मजला अे विंग, बि.एम.सी. गोडावुन बिल्डींग, संस्कृती कॉम्पलेक्स जवळ, ठाकुर कॉम्पलेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

जा.क्र. मुंबई/उपनि/पी विभाग/बी-३/जाहीर नोटीस/४७३१/सन २०२५ दिनांक :- १८/०३/२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे अन्वये कलम १५४ ब २९ अन्वये अर्ज

जाहिर नोटीस

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ नुसार **सुवर्ण प्रभात निकेतन को-ऑप. हौसींग सोसायटी लि., प्लॉट नं. ०५, रामचंद्र लेन एक्सटेन्शन, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४.** या संस्थेने खालीलप्रमाणे जाब देणार यांच्याविरुध्द वसुली दाखला मिळणेसाठी अर्ज केलेले आहेत.

अनु.क्र.	अर्ज क्र.	जाब देणार यांचे नाव
१	१६	**श्री. एम. के. शहा, गॅरेज क्र. ०२**

२. सदर प्रकरणाची या कार्यालयामध्ये **दिनांक ०४/०७/२०२४, १०/०९/२०२४, १५/१०/२०२४, ३१/१२/२०२४, १६/०१/२०२५, २५/०२/२०२५ व १८/०३/२०२५** रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. परंतु सदर सुनावणीवेळी जाबदेणार गैरहजर होते त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी **दिनांक ०३/०४/२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता** या कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे.
३. जाब देणार अथवा त्यांचे कायदेशीर वारस किंवा प्राधिकृत व्यक्ति मार्फत याबाबत समक्ष हजर राहून त्यांचे लेखी म्हणणे/आक्षेप संबधित कागदपत्रांच्या पुराव्यासह दाखल करावा व या प्रकरणी त्यांचा युक्तिवाद करावा.
४. या प्रकरणी जाबदेणार / कायदेशीर वारस किंवा प्राधिकृत व्यक्ति हजर राहिले नाही अथवा लेखी / तोंडी म्हणणे दाखल केले नाही तर या प्रकरणी एकतर्फी सुनावणी घेऊन अर्जाबाबत निर्णय दिला जाईल.
५. सदरची नोटीस ही आज **रोजी १८/०३/२०२५** माझ्या सही शिक्यानिशी देत आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक,
सहकारी संस्था, पी-विभाग, मुंबई

उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय
रुम नं.३०३, तिसरा मजला अे विंग, बि.एम.सी. गोडावुन बिल्डींग, संस्कृती कॉम्पलेक्स जवळ, ठाकुर कॉम्पलेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

जा.क्र. मुंबई/उपनि/पी विभाग/बी-३/जाहीर नोटीस/४७३०/सन २०२५ दिनांक :- १८/०३/२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे अन्वये कलम १५४ ब २९ अन्वये अर्ज

जाहिर नोटीस

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ नुसार **लेक व्हयु ||| को-ऑप. हौसींग सोसायटी लि., रॉयल पाल्म इस्टेट, आरे कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई- ४०००६३.** या संस्थेने खालीलप्रमाणे जाब देणार यांच्याविरुध्द वसुली दाखला मिळणेसाठी अर्ज केलेले आहेत.

अनु.क्र.	अर्ज क्र.	जाब देणार यांचे नाव
१	०९	**मे. स्मार्ट व्हिजन सी/ओ भारत, सदनिका क्र. ००१, श्री. भारत विश्वनाथ सोलर स्मार्टनिअस १२ जी सोल्युशन प्रा. लि.**

२. सदर प्रकरणाची या कार्यालयामध्ये **दिनांक ०४/०७/२०२४, १०/०९/२०२४, १५/१०/२०२४, ३१/१२/२०२४, १६/०१/२०२५, २५/०२/२०२५ व १८/०३/२०२५** रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. परंतु सदर सुनावणीवेळी जाबदेणार गैरहजर होते त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी **दिनांक २४/०४/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता** या कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे.
३. जाब देणार अथवा त्यांचे कायदेशीर वारस किंवा प्राधिकृत व्यक्ति मार्फत याबाबत समक्ष हजर राहून त्यांचे लेखी म्हणणे/आक्षेप संबधित कागदपत्रांच्या पुराव्यासह दाखल करावा व या प्रकरणी त्यांचा युक्तिवाद करावा.
४. या प्रकरणी जाब देणार / कायदेशीर वारस किंवा प्राधिकृत व्यक्ति हजर राहिले नाही अथवा लेखी / तोंडी / म्हणणे दाखल केले नाही तर या प्रकरणी एकतर्फी सुनावणी घेऊन अर्जाबाबत निर्णय दिला जाईल.
५. सदरची नोटीस ही आज **रोजी १८/०३/२०२५** माझ्या सही शिक्यानिशी देत आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक,
सहकारी संस्था, पी-विभाग, मुंबई

निडो होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार /हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
१	**अजय हतनोरे** (कर्जदार), **सुनीता अजय हतनोरे** (सहकर्जदार)	१९.०३.२०२५ रोजीनुसार एलएएन नं. **एलएमयूएम एसटीएच००००३६४९२** अंतर्गत **रु. १८,७५,६६१.२०** (रु. अठरा लाख पंचाहत्तर हजार सहाशे एकसष्ट व वीस पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च	**रु. १२,३३,८५६/-** (रु. बारा लाख तेहतीस हजार आठशे छप्पन मात्र) **इसारा रक्कम ठेव - रु. १,२३,३८५/-** (रु. एक लाख तेवीस हजार तीनशे पंचाऐंशी मात्र)	**१०.०४.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयंविस्तारासह)**
परीक्षणाचा दिनांक व वेळ - दि. २८.०३.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.००			**प्रत्यक्ष ताबा दिनांक - २५.०९.२०२४**	

मालमत्तेची अनुसूची : पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड - फ्लॅट क्र. २०१६, दुसरा मजला, क्षेत्र मोजमापित ४१२ चौ. फूट (चटई क्षेत्रफळ), ''डी-इमारत'', इमारतीचे नाव देव, फेज-४ मधील, करमनगरी नावाने ज्ञात प्रोजेक्टमधील सर्व्हे क्र. ७०/१ व ७१ धारक जमिनीच्या भूखंडावर निर्मित, पिंपरी गाव, पिंपरी ग्रामपंचायत हद्दीतील व नोंदणीकरण जिल्हा उपजिल्हा ठाणे येथील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई-लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : ०९.०४.२०२५.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४
दिनांक : २०.०३.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

निडो होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

ई-लिलाव - वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
१	**किशोर दिलीप झेंडे** (कर्जदार) व **मनोज दिलीप झेंडे** (सहकर्जदार)	एलएएन नं. : एलकेवायएनएसटीएच००००८६२२९ व एलकेवायएनएसटीटी००००८६५७१ करिता **दि. १९.०३.२०२५ रोजीनुसार रु. २०,३५,५९०.७१** (रु. वीस लाख पस्तीस हजार पाचशे नव्वद व एकाहत्तर पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज व कायदेशीर खर्च.	**रु. २०,३२,३०५/-** (रु. वीस लाख बत्तीस हजार तीनशे पाच मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. २,०३,२३०/-** (रु. दोन लाख तीन हजार दोनशे तीस मात्र)	**३०.०४.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**
परीक्षण दिनांक व वेळ : दि. १५.०४.२०२५ रोजी स ११.०० ते दु. ३.००			**प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. ०८.०२.२०२५**	

प्रतिभूत संपत्तीचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. ४०७, मोजमापित ३१.०५ चौ. मी. चटई क्षेत्रफळ, चौथा मजला, डी विंग, इमारतीचे नाव ''सिग्नेचर अँक्वा'', सर्व्हे क्र. ४३, हिस्सा क्र. ३ए धारक मालमत्तेवर निर्मित, गाव लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड, नोंदणीकरण जिल्हा रायगड, उपनोंदणीकरण जिल्हा कर्जतअंतर्गत.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई-लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : २९.०४.२०२५.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४
दिनांक : २०.०३.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)